# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य

– डॉ. शुभदा सुरेश लोंढे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य –**

**व्यक्तीला स्वत्वाची जाणीव करून देण्यासाठी शिक्षण –** व्यक्तीला स्वतःची ओळख ही शिक्षणामुळेच प्राप्त होईल असे आंबेडकरांचे ठाम मत होते. आपण कोणत्या पातळीवर आहोत आणि पातळी उंचावण्यासाठी काय करायला हवे याची जाणीव शिक्षणामुळेच प्राप्त होईल असे त्यांचे मत होते; यासाठीच त्यांनी विविध वसतिगृहे, वाचनालये, अनेक शाळा, महाविद्यालये, विशेषतः प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या.

**शिक्षण ही मूलभूत गरज –** व्यक्तीला जशी अन्नाची गरज असते तशीच शिक्षणाचीही गरज असते. अन्नाशिवाय व्यक्ती कुपोषित किंवा मृतप्राय होते; त्याचप्रमाणे शिक्षणाशिवाय व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या निष्प्रभ होतो. दुसऱ्याचा गुलाम होतो, म्हणून व्यक्तीला अन्नासोबतच चांगल्या शिक्षणाची गरज आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

**गुलामगिरी नष्ट करून अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी शिक्षण–** शिक्षण म्हणजे मानसिक, बौद्धिक विकास घडवून आणण्याचे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे आणि राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याचे साधन आहे असे डॉ. आंबेडकर मानतात. शोषणापासून मुक्ती मिळवायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे त्यांचे मत होते. अशिक्षित किंवा अल्पशिक्षित व्यक्तीचे शोषण कोणाकडूनही होऊ शकते, पण त्या शोषणाविरुद्ध लढण्याची ताकद व वैचारिक शक्ती शिक्षणामुळेच प्राप्त होते.

**समाजातील दुःख, दारिद्र्य नष्ट करण्यासाठी शिक्षण –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाला प्रगतीचे साधन मानतात. ज्ञानाअभावी मनुष्याचे तद्वतच समाजाचेही नुकसान होते. एखाद्या व्यक्ती किंवा समाजाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्या व्यक्ती किंवा समाजाचे अस्तित्व नाकारून त्याच्या क्षमतांना मारून टाकणे होय, अशी त्यांची शिक्षणाविषयक धारणा होती. समाजातील दुखण्यावर योग्य इलाज शिक्षणच असू शकते. शिक्षणप्रणालीतून प्रज्ञा, शील

आणि करुणा या तत्त्वांचा प्रसार व्हावयास हवा.

**समाजातील परिवर्तनासाठी शिक्षण–** समाजसमाजसुधारणेचे मूळ शिक्षण आहे. शिक्षणासारखे समाजपरिवर्तनाचे दुसरे साधन नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडवण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता आहे असे ते मानतात. 'व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या करीत शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते. स्वावलंबी व स्वाभिमानी जीवन जगण्यासाठी शिक्षण हे अतिशय महत्त्वाचे आहे असे ते पटवून देतात.

**स्वातंत्र्य, समता, बंधुतेच्या तत्त्वावर राष्ट्र उभारणीचे साधन म्हणजे शिक्षण –** फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली अभूतपूर्व देणगी म्हणजे स्वातंत्र्य, समता, व बंधुता. ज्याठिकाणी स्वातंत्र्य नसेल त्या ठिकाणी गुलामगिरी आणि पारतंत्र्य येते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी केलेली अधिकारांची मागणी म्हणजे स्वातंत्र्य. ज्या देशांमध्ये जात, धर्म, वंश, पंथ, लिंग, वर्ग या कारणांमुळे विषमता असते तेथे समानता नाहीशी होऊन समाजात भेदभाव निर्माण होतो. असा भेदभाव राष्ट्राला घातक असल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी संविधानात समान दर्जा व समान संधीची तरतूद करून समता प्रस्थापित करण्यासाठी अथक प्रयत्न केले. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही राष्ट्र बांधण्याची साधने आहेत व त्यातूनच शोषणमुक्त समाज निर्माण होऊन देशाची आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगती होईल असे ते मानतात.

**प्राथमिक शिक्षणविषयक विचार व कार्य –** प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा व राष्ट्रउभारणीचा पाया आहे म्हणून ते दर्जेदार व गुणवत्तापूर्णच असावयास हवे असे त्यांचे मत होते. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की मुलगा किंवा मुलगी यांनी एकदा शाळेत प्रवेश घेतला की त्यांचे शिक्षण लिहिण्या–वाचण्यापुरते मर्यादित राहू नये तर ते संपूर्णपणे साक्षर होऊनच बाहेर पडावेत व पुढील आयुष्यातसुद्धा ज्ञानसंपादन करीतच राहावेत अशी प्रेरणा त्यांच्यात निर्माण व्हावी. विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठीही प्रयत्न व्हायला हवेत. प्राथमिक शिक्षणासाठी सरकारने जास्तीत जास्त अनुदान मंजूर करावे असा त्यांचा आग्रह होता. शिक्षणाच्या व्यापारीकरणाला त्यांचा विरोध होता. सामान्य माणसाला शिक्षण घेणे सुलभ व्हावे अशी शिक्षणाची व्यवस्था असावी. गोरगरीब वर्गाला शिक्षण खर्चाची खंत वाटता कामा नये. सर्वांना परवडेल अशारीतीने शिक्षणसंस्थांना अनुदानाची आखणी शासनाने करून द्यावी असे त्यांचे मत होते. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असे म्हणताना ते मोफतही असावे असे त्यांना अभिप्रेत आहे; परंतु ते सर्वांना मोफत नसावे तर ज्यांच्यात

फी भरण्याचे सामर्थ्य आहे त्यांच्याकडून फी घ्यावी, यासाठी नवीन करही लावावेत म्हणजे सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागवण्यास मदत होईल अशी त्यांची आग्रही भूमिका होती. शिक्षणाचा पायाभूत विचार करताना ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही त्यांच्यासाठी सक्तीचा कायदा असावा असे ते म्हणतात. शिक्षणाचा पारंपरिक दृष्टिकोन बाजूला ठेवून विज्ञानवादी दृष्टिकोन समोर ठेवून अभ्यासक्रम बनवला जावा.

**उच्च शिक्षणविषयक विचार व कार्य** – उच्च शिक्षणाचे महत्त्व डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचारातून, कृतीतून व स्वानुभवातून पटवून व दाखवून दिले. अल्पशिक्षित व्यक्तीवर कोणताही व कोणाकडूनही सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्याय, अत्याचार होऊ शकतो परंतु उच्च शिक्षणामुळे याची जाणीव झाल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अन्याय–अत्याचाराविरुद्ध, शोषणाविरुद्ध व्यक्ती पेटून ऊठू शकते व न्यायासाठी झगडून न्याय मिळवू शकते. समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे सांगितले किंवा भासवले जाते परंतु हे चूक आहे असे ते मानतात. गोरगरीब समाजाची उन्नती करणे म्हणजे त्याला अन्न, वस्त्र ,निवाऱ्याची सोय करून परावलंबी व गुलाम बनवणे नव्हे तर त्याला उच्चशिक्षित करून गुलामगिरीची जाणीव करून देऊन स्वतःच्या, समाजाच्या व देशाच्या प्रगतीसाठी सक्षम करणे हेच उच्च शिक्षणाचे ध्येय असायला हवे असे ते म्हणतात. उच्चशिक्षणासंबंधी विचार मांडताना डॉ. आंबेडकरांनी पदवीपूर्व अभ्यासक्रम पदवी अभ्यासक्रमापासून वेगळे करू नयेत, हे वेगळे केल्यास संशोधन कार्याचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली. विद्यापीठ ही मध्यवर्ती संस्था असून, समन्वयाची भूमिका स्वीकारली जावी या दृष्टीने विद्यापीठातल्या विविध विद्याशाखा, व्यवस्थापन मंडळ, सिनेट यांच्या रचना करण्यात याव्यात असे त्यांना वाटे. शिक्षणाभिमुख विद्यापीठ असे विद्यापीठाचे स्वरूप त्यांना अपेक्षित होते. विद्यापीठाचे ध्येय व कार्य यांच्या पूर्तीसाठी विद्यापीठ मंडळाच्या रचना आदींचा विचार करून विद्यापीठातील प्रोफेसर, रीडर, महाविद्यालयातील प्राचार्य, लेक्चरर, ज्युनिअर लेक्चरर आणि तत्कालीन विद्यार्थी यांच्या संदर्भात विचार मांडून त्यांची कार्यपद्धतीही त्यांनी विशद केली. उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शासनाने आपल्या धोरणात बदल करून उच्च शिक्षणावरचा खर्च वाढवण्याच्या सूचना आंबेडकरांनी वेळोवेळी दिल्या.पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन करून त्यांनी १९४६ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेज तर १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून उच्च शिक्षणाच्या प्रचारासाठी तहहयात प्रयत्न केले.

**स्त्री–शिक्षण विषयक विचार व कार्य** – समाजपरिवर्तनाचा वेध लागलेल्या

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्त्री-शिक्षण विषयक विचार मांडताना आंबेडकर म्हणतात की, मुलाला शिक्षण दिल्याने एकच व्यक्ती शिक्षित होते परंतु मुलीला शिक्षण दिल्याने संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. मी एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्या समाजातील महिलांच्या झालेल्या प्रगतीवरून करतो असे मत त्यांनी मांडले. भारतीय संविधानाच्या कलम १६ अनुसार स्त्री-पुरुष भेद असलेली सामाजिक व्यवस्था अनैसर्गिक मानून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा देऊन सामाजिक न्यायाची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बजावली. मुलामुलींच्या सहशिक्षणाची कार्यप्रणाली डॉ. आंबेडकरांना अपेक्षित होती. वेगळ्या शाळा काढून त्यांना सामाजिक अभिसरणापासून जाणून-बुजून परावृत्त ठेवण्याच्या प्रवृत्तीला त्यांचा विरोध होता. महिलांना सर्वप्रकारचे हक्क मिळावेत यासाठी आंबेडकरांनी अनेक सभा-संमेलनातून, विविध परिषदांमधून तसेच आपल्या लिखाणातून, हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून, राज्यघटनेतून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करून स्त्रियांच्या स्थितीला सुधारण्याचा प्रयत्न केला.

**समाज व देश सुधारण्याचे शस्त्र किंवा हत्यार म्हणजे शिक्षण –** शिक्षण हे समाजसुधारणेचे व परिवर्तनाचे हत्यार आहे त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. शिक्षण हे सामाजिक गुलामगिरी, वैचारिक गुलामगिरी नष्ट करणारे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय दृष्ट्या स्वातंत्र्य मिळवण्याचे शस्त्र आहे असे ते म्हणत. व्यक्ती, समाज व देशांमध्ये परिवर्तन घडवण्यासाठी विद्येची आराधना करावीच लागेल. ही साधना यशस्वी झाली तर माणूस जगाच्या पाठीवर आपली व आपल्या देशाची कीर्ती पसरवू शकतो. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला तलवारीची उपमा दिली. ज्याप्रमाणे तलवार एखाद्याचा संहार करू शकते तसेच ती स्वसंरक्षणासाठीही उपयोगी पडत असते म्हणजेच शिक्षणासोबत व्यक्तीजवळ चांगले शील असणे, नैतिकता असणेही तेवढेच अपरिहार्य आहे. शीलवान व्यक्ती आपल्या ज्ञानाचा वापर चांगल्या कामासाठीच करत असते.

**विषमता नष्ट करण्यासाठी व सामाजिक लोकशाहीसाठी शिक्षण –** भारतात मोठ्या प्रमाणात विषमता आहे. जात, धर्म, पंथ, लिंग, रूढी-परंपरा, संपत्ती किंवा वर्ग यांच्या आधारे मोठ्या प्रमाणात असलेली विषमता शिक्षणानेच नष्ट होऊ शकते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. देशामध्ये, समाजामध्ये लोकशाही खऱ्या अर्थाने रुजणे गरजेचे आहे.

**राजकीय क्रांतीचा पाया म्हणजे शिक्षण –** राजकीय सत्ता ही प्रगतीच्या सर्व दरवाजांची किल्ली आहे असे डॉ. आंबेडकर म्हणतात. आपल्या 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'प्रबुद्ध भारत' या वृत्तपत्रांमधून, विविध पाक्षिकांमधून शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. डॉ. आंबेडकरांनी मुंबईत जुलै १९५६ पासून संसदीय

शिक्षण देणारी एक आदर्श संस्था 'ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स' ची स्थापना केली होती. त्यात राजकारण, अर्थशास्त्र, अंदाजपत्रक, कामगार संघटना, संसदीय कामकाजविषयक नियम व परंपरा इत्यादी आवश्यक विषयांबरोबर वक्तृत्व साधनेला प्राधान्य दिले होते. खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या संस्थेचे संचालक होते. डिसेंबर १९५६ मध्ये वक्तृत्वावर व्याख्यान देण्याचे त्यांनी निश्चित केले होते; परंतु दुर्दैवाने त्यांच्या आकस्मित महापरिनिर्वाणाने एका प्रभावी वक्त्याच्या मार्गदर्शनाला ही संस्था आणि तिचे उत्सुक विद्यार्थी मुकले.

**समारोप –**

माणसात स्वत्वाची जाणीव निर्माण करणारे थोर क्रांतिकारक, महापुरुष, लोकशाहीप्रधान राज्यघटनेचे शिल्पकार, धर्माची खरी व्याख्या लोकांना पटवून देणारे लोकशिक्षक, समाजसुधारक, थोर शिक्षणतज्ञ, जगातील सर्वात मोठ्या मानवमुक्ती लढ्याचे प्रमुख, विश्वभूषण म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ओळखले जातात. त्यांनी गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानले होते; म्हणून त्यांच्या विचारांचा ठसा बाबासाहेबांच्या विचारात व कार्यात पदोपदी जाणवतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या आधारभूत तत्त्वांचे डॉ. आंबेडकर हे पुरस्कर्ते होते. ज्ञान हीच विकासाची गुरुकिल्ली त्यांनी मानली. आंबेडकरांच्या शिक्षणविषयक विचारांतून व कार्यातून संपूर्ण समाज व संपूर्ण देशाच्या उन्नतीचा संदेश व्यक्त होतो. सुसंस्कृत समाज व बलशाली भारत घडवायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हा विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असलेली शैक्षणिक क्रांतीची लाट आपल्या देशात अजूनही हव्या त्या प्रमाणात आलेली नाही आणि ती येण्यासाठी गरज आहे ती शैक्षणिक धोरण ठरवणाऱ्या, राबवणाऱ्या किंवा अंमलबजावणी करणाऱ्या लोकांच्या, शासनाच्या इच्छाशक्तीची. आंबेडकरांच्या विचारांमुळे आज संपूर्ण भारतात हळूहळू का होईना परिवर्तन होत आहे. आज जागतिकीकरणाच्या कोलाहलात आंबेडकरांच्या विचारांची नितांत आवश्यकता निर्माण झालेली आहे. अशा या महाप्रतिभा संपन्न अशा महामानवाला कोटी कोटी प्रणाम.

संदर्भ –


१. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२. डॉ. भालचंद्र फडके, फुले आंबेडकर शोध आणि बोध, आनन प्रकाशन, औरंगाबाद.
३. शंकरराव खरात, दलितांचे शिक्षण,इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे, महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.


ଔ